# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### धुळे जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेबाबत

**(१) ५८३७ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्रासाठी राबविण्यात येणा-या जलयुक्त शिवार योजनेसाठी राज्य शासनाने १ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून जानेवारी, २०१५ पासून त्याची कामे सुरु करणार असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कोणत्या गावांची निवड करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत धुळे जिल्हयासाठी किती निधी वितरीत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) धुळे जिल्हयात एकूण १२९ गावांची निवड करण्यात आलेली आहे.

(३) रु. १००० कोटीच्या विशेष निधीतून धुळे जिल्हयासाठी रु. २१.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच जलसंधारण व इतर विभागाच्या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेमधून या गावांकरिता सुमारे रु. ३३.०७ कोटी निधी उपलब्ध होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांदळवन कक्ष, नवी मुंबई, मुंबई परिसरातील वनक्षेत्रापाल यांनी शासनाच्या धनादेशाचा गैरवापर केल्याबाबत**

**(२) ७३५० (०७-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदळवन कक्ष, नवी मुंबई येथील वनक्षेत्रपाल श्रीमती एस.एम.आडगावकर यांनी प्रशिक्षणासाठी दिनांक ९ जानेवारी, २०१५ पासून एक महिन्याच्या कालावधी करीता स्वतःकडील कार्यभार हस्तांतरण केला असताना या कालावधी त्यांच्याकडे कोणताही कार्यभार नसताना दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी कार्यालयाच्या धनादेश पुस्तकाचा गैरवापर करुन सुमारे रुपये १,००,०००/- (एक लाख) शासकीय निधी बँकमधून काढला व तीन दिवस सदरील निधीचा वापर आपल्या वैयक्तिक कारणासाठी करुन तीन दिवसानंतर सदरील निधी पुन्हा शासनाकडे जमा करुन शासकीय निधीचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या चौथ्या आठवडयात वा त्यानुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपहाराचा वनपरिक्षक अधिकारी (RFO) व वन अधिकारी (DFO) यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०९-२०१५) :**(१) (२) व (३) रोपवन कामावरील मजुरांना मजुरी अदा करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी दिनांक २४.१२.२०१४ अन्वये रूपये ७५,०००/- रक्कमेचा धनादेश श्रीमती एस.एम.आडगांवकर, वनक्षेत्रपाल, नवी मुंबई यांना दिला होता. सदर धनादेश त्यांनी दिनांक ०६.०१.२०१५ रोजी शासकीय खात्यात जमा करून दिनांक ०९.०१.२०१५ रोजी त्यांनी बँकेत चौकशी केली असता, सदर धनादेश खात्यात जमा झाला नसल्याचे समजले.

श्रीमती एस.एम.आडगावकर, वनक्षेत्रपाल, या दिनांक ०९.०१.२०१५ रोजी मालवण येथील प्रशिक्षणासाठी गेल्या होत्या. त्यांचा कार्यभार वनक्षेत्रपाल, कादळवन संधारण घटक पश्चिम, मुंबई यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला होता. दरम्यान मजुरांनी मजुरी मिळणेकरिता पाठपुरावा केल्यामुळे, प्रभारी वनक्षेत्रपाल यांनी भ्रमणध्वनीवरून श्रीमती एम.एस.आडगावकर, वनक्षेत्रपाल यांना मजुरांची मजुरी अदा करण्यास कळविले होते. त्यानुसार श्रीमती आडगावकर, वनक्षेत्रपाल यांनी दिनांक २०.०१.२०१५ रोजी मुंबई येथे येऊन मजुरांची मजुरी अदा करण्याकरिता रूपये ७५,०००/- बँकेतून काढले होते, तथापि, ज्यांना मजुरी अदा करावयाची होती, ते मजुर दुसऱ्या ठिकाणी कामावर गेल्याने मजुरी घेण्यास येऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी सदर रक्कम कार्यालयील कपाटात ठेवून दिनांक २३.०१.२०१५ रोजी बँकेत जमा केली त्यावरून सदर रक्कम स्वत:चे कामासाठी वापरले किंवा अपहार झाला असे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील आदिवासी बहुल वस्तीत वन अधिनियमातील जाचक अटीमुळे सदर पाड्यांवर नागरी सुविधा पुरविल्या जात नसल्याबाबत**

**(३) ८२२३ (०७-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील कोकणीपाडा, नवापाडा, येऊरगाव, पाटीलपाडा, वणीचापाडा व इतर आदिवासी बहुल वस्तीत वन अधिनियमातील जाचक अटींमुळे सदर पाड्यांवर नागरी सुविधा पुरविल्या जात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तथापि, राज्य शासनाने सन २०१२ रोजी काढलेल्या अधिसूचनेद्वारे वन जमिनीवरील आदिवासी पाड्यांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या धोरणामुळे उपरोक्त आदिवासी पाड्यांना सुविधा पुरविण्यात आल्या आहेत काय, असतील तर कोणत्या प्रकारच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील येऊर गाव वगळता कोणत्याही आदिवासी पाड्यांना महसूली दर्जा प्राप्त नाही. मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे हे अतिक्रमित पाडे असल्याने त्यांचे पुनर्वसन उद्यानाबाहेर करावयाचे आहे. जोपर्यंत सदर पाड्यांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत अस्तित्वात असलेल्या नागरी सुविधा पुर्ववत सुरु ठेवाव्यात व अतिक्रमणात वाढ होऊ नये म्हणून वनहद्दीत कोणत्याही प्रकारच्या नवीन नागरी सुविधा देऊ नयेत असेही स्पष्ट आदेश दिले आहेत.

(२) दिनांक २०.०४.२०१२ रोजी मा. मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या बैठकीत उद्यानातील आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन हद्दीबाहेर होईपर्यंत पूर्ववत सुरु असलेल्या सुविधा दुरुस्ती करणेसाठी सक्षम अधिकाऱ्यांने दाखला दिल्यानंतर खराब झालेल्या नागरी सुविधांच्या निव्वळ दुरुस्तीसाठी परवानगी देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वनविभागामार्फत कोणत्याही नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. तथापि महानगर पालिकेतर्फे तसेच इतर विभागांमार्फत यापूर्वीच पुरविण्यात आलेल्या सुविधा (वीज, पाणी) सदर पाडयांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन होईपर्यंत सुरु राहतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील काही जिल्हयातील सुमारे २५०० नॉन मॅट्रीक वन कर्मचा-यांना थेट वन परिक्षेत्रे अधिका-यांची वेतन क्षेणी दिल्याची बाब**

**(४) ८५९६ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या पदानुसार शैक्षणीक पात्रतेचे निकष धुडकावून राज्यातील काही जिल्ह्यातील सुमारे २५०० नॉन मॅट्रीक वन कर्मचा-यांना थेट वन परिक्षेत्र अधिका-यांची वेतन श्रेणी दिली गेल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१३ दरम्यान मुंबई मॅट ने या नियमबाह्य बढती व वेतनातील लाभांवर नाराजी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १२ डिसेंबर, २०१३ दरम्यान शासनाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षकांना (प्रशासन) पत्र पाठवून चुकीच्या पध्दतीने पदोन्नती व वेतनाचा लाभ देणा-या वन प्रशासन प्रमुखाविरुध्द कारवाईचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाब १,२ व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाद्वारे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, कारवाईस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५)** :(१) ते (४) वनक्षेत्रपाल सेवा प्रवेश नियम १९९७ मधील नियम (३) (अ) नुसार, ज्यांनी वनपाल पद धारण केले आहे आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व किमान शैक्षणिक पात्रतेसह वनपाल म्हणून तीन वर्षाहून कमी नाही अशी नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधून, ज्येष्ठतेच्या आधारे, पात्रतेच्या अधीन राहून योग्य व्यक्तीस पदोन्त करण्यात येईल.

माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक व वनपाल यांना वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०१.०४.२०१० मधील तरतूदीनुसार आश्वासीत प्रगती योजनेच्या दुसरा लाभ मंजूर करणेबाबत, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ८८२/२०१२ मध्ये, मा.न्यायाधिकरणाने दिनांक १३.१०.२०१३ अन्वये दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये, आश्वासीत प्रगती योजनेच्या दुसरा लाभ मंजूर करणे हा संबंधित कर्मचाऱ्यांचा अधिकार नसून असा लाभ केवळ तो कर्मचारी त्यासाठी निर्धारित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असले तरच देण्यात यावा, असे स्पष्ट केले आहे.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई च्या उक्त निर्णयापूर्वी वनरक्षक व पदोन्नत वनपाल यांना वनक्षेत्रपाल पदाची वेतनश्रेणी देण्यात आली असली तरी जाणीवपूर्वक देण्यात आली नाही.

सदर कर्मचाऱ्यांना, वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०१.०४.२०१० मधील तरतूदीनुसार आश्वासीत प्रगती योजनेच्या दुसरा लाभ  देय ठरत नसल्याने, सदर लाभ काढून घेण्याकरीता व झालेल्या अतिप्रदानाची वसूली करण्याकरीता, अपर  प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दिनांक १३.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कार्ला (ता.मावळ) कामशेत हद्दीत एकवीरा देवीच्या डोंगरावर जैवविविधतेची हानी होत असल्याबाबत**

**(५) ९२२४ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामशेत हद्दीत कार्ला येथील एकवीरा देवीचा प्रसिध्द डोंगर वन अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे अज्ञातांनी पेटविल्याने जैवविविधतेची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगर वन परिसरात विविध प्रकारचे वन्य जीव प्राणी वास्तव्य करतात मात्र जंगल पेटविल्याने त्यांची वसतिस्थाने नष्ट झाली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सर्प, मुंगूस यांचा वावर जंगलात मोठ्याप्रमाणात वावरत असून नागरीकांमध्ये भीती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वन विभागाच्या दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात आली काय व असल्यास, कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-१०-२०१५) :**(१) मौजे कार्ला येथील वनक्षेत्रात आगीची घटना घडलेली नाही. त्यामुळे जैवविविधतेची मोठ्या प्रमाणात हानी होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सर्प, मुंगूस यांचा वावर सदर परिसरात आहे, तथापि याबाबत भीती असल्याची नागरीकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण तालुक्यातील (जि. रत्नागिरी) या लघुसिंचन प्रकल्पांची पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची निविदा रद्द केल्याबाबत**

**(६) १२४२० (०६-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मुंढे तर्फे सावर्डे, कापरे, गांग्रई, गणेशपूर, रिक्टोली-तिवडी या लघु सिंचन प्रकल्पांची पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व रितसर प्रशासकीय मान्यता झालेल्या कामांच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष व डोंगरी भागातील उन्हाळी हंगामात पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी पाण्याची तीव्र टंचाई असल्याने सदर प्रकल्पांची कामे सुरु होण्याच्या दृष्टीने फेर निविदा प्रक्रिया सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी मा. जलसंधारण मंत्री यांना निवेदन देऊन विनंती केली आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) गणेशपूर, रिक्टोली-तिवडी या योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासणीचे काम महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांचे पत्र दिनांक २४ डिसेंबर, २०१४ अन्वये क्षेत्रिय स्तरावर चालू आहे. तथापि, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, महामंडळाचे पत्र, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ अन्वये आर्थिक दायित्व मर्यादित करण्याच्या हेतूने मुंढे तर्फ सावर्डे, कापरे, गांग्रई, गणेशपूर, रिक्टोली-तिवडी योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याच्या प्रस्ताव मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेकडून दिनांक ५ मे, २०१५ च्या पत्रान्वये जलसंधारण महामंडळास पाठविण्यात आला आहे. तसेच योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी मुख्य अभियंत्याची त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली असून सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूम, परांडा व वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याची मागणी

**(७) १२८०३ (०८-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम, परांडा व वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याची मागणी मा.प्रधान सचिव, जलसंधारण विभाग यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या सप्ताहात तसेच तत्पुर्वी अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५) :**(१), (२) व (३) होय, तथापि ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पांचे परिरक्षण व दुरुस्ती या योजनेंतर्गत लेखाशीर्ष संकेतांक क्रमांक २७०२ १४७९ खाली निधी मिळण्यासाठी, शासन पत्र दिनांक ७/११/२०१३ अन्वये निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन करुन परिपूर्ण प्रस्ताव संबंधित मंडळ कार्यालय व मुख्य अभियंता कार्यालय यांचे शिफारशीने शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून यथायोग्य प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेच्या अधीन त्यावर शासनाकडून उचित निर्णय घेता येणे शक्य आहे.

---

**सडक / अर्जुनी तालुक्यातील (जि.गोंदिया) शेंडा कोयलारी येथील साठवण बंधा-याचे बांधकाम निकृष्ट असल्याबाबत**

**(८) १२९९४ (०८-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक / अर्जुनी तालुक्यातील (जि.गोंदिया) शेंडा/कोयलारी येथे जिल्हा परिषद लघु पाटंबधारे विभागामार्फत बनविण्यात आलेल्या साठवण बंधा-याचे बांधकाम निकृष्ट साहित्य वापरुन तसेच गरज नसलेल्या ठिकाण बांधण्यात आल्याचा आरोप शेंडा/कोयलारी येथील सरपंच व नागरीकांनी केला असल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमरास केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साठवण बंधा-यांची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

अशा प्रकारचे तक्रारीबाबतचे पत्र सरपंच, ग्राम पंचायत कोयलारी यांचे माध्यमाने माहे ऑगस्ट, २०१४ चे सुमारास लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंता, लघु सिंचन उपविभाग आमगांव यांनी चौकशी करुन दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी अहवाल लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयास सादर केला. सदर बंधारा योग्य ठिकाणी बांधण्यात आले असल्याचे व तक्रारीत कोणतीही सत्यता नसल्याचे अहवालात नमूद केले आहे.

त्यानंतर दिनांक १८ जून, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी सदर बंधाऱ्याची मोका चौकशी केली असता कोयलारी शेंडा येथील बंधारा सुस्थितीत आढळून आला. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानात २० गावे घेण्यात आल्याबाबत**

**(९) १३०९८ (०८-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यात ३६गावे ही टँकर फेड असूनही प्रत्यक्षात जलयुक्त शिवार अभियानात २० गावे घेण्यात आलेली आहे व प्रत्यक्षात सातच गावात कार्यक्रम मंजूर झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, संपूर्ण २० गावांना जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत कामे घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे, पारोळा तालुक्यात सतत ३ वर्षे टँकरग्रस्त असलेली व भविष्यात होऊ शकणारी अशी २० गावे आहेत.

सन २०१५-१६ च्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पारोळा तालुक्यातील ७ गावे गाव निवड निकषानुसार निवडण्यात आली असून त्यामध्ये कामे सुरु आहेत.

(२) जळगाव जिल्हयास सन २०१५-१६ करीता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २३२ गावे निवडण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते. पारोळा तालुक्यातील गाव निवडीच्या निकषानुसार पाणलोट कामे सुरु असलेली ७ गावे सन २०१५-१६ करीता निवडण्यात आलेली आहेत.

(३) जलयुक्त शिवार अभियान सन २०१९ पर्यंत राबविण्यात येणार असून दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट असून पारोळा तालुक्यातील इतर गावे निवडीच्या निकषानुसार दरवर्षी निवडण्यात येणार आहेत.

---

## राज्यातील विदर्भ वगळता तांत्रिक व्यवहार्यता नसलेली जलसंधारणची कामे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय

**(१०) १६३९५ (१७-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आघाडी शासनाच्या कालखंडातील विदर्भ वगळता जलसंधारणाच्या कामाची व्यवहार्यता तपासून, २५० हेक्टरपर्यंतची कामे रद्द करण्याची शिफारस करण्याकरीता शासनाने मुख्य अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य समिती मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नियुक्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील किती व कोणकोणती कामे अव्यवहार्य असल्याची शिफारस समितीने केली आहे,

(४) सदरच्या निकषातून विदर्भ वगळण्याची कारणे काय आहेत,

(५) आघाडी शासनाच्या काळातील कामांची व्यवहार्यता तपासण्यासाठी मुख्य अभियंत्यांचे मत घेण्यात आले नाही काय,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ८ मे, २०१५ अन्वये दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) ज्या योजनांची निविदा प्रक्रिया चालू/पुर्ण झाली आहे, ज्या योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले परंतु कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही व प्रशासकीय मानयता दिलेल्या आहेत. परंतु पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नाही अशा सर्व योजनांचे (० ते २५० हेक्टर) तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तीन मुख्य अभियंता यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(२) व (३) समितीने आपला अहवाल महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास सादर केला असून सदर अहवाल महामंडळाच्या विचाराधीन आहे.

(४) विदर्भातील प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनांच्या उर्वरित किंमतीचा व विदर्भासाठी महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या नियतव्यायाचा विचार करता, विदर्भातील कामे या निकषानुसार वगळण्यात आली आहेत.

(५) दिनांक १ एप्रिल, २०१४ पुर्वी प्रशासकीय मान्यत दिलेल्या परंतु प्रत्यक्षात काम सुरु न झालेल्या तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या सर्व योजनांची तपासणी (विदर्भ वगळून) करण्यासाठी मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महिला व बालकल्याण विभागाने बालगृहांच्या भोजनाचे अनुदान न दिल्याबाबत.**

**(११) १६५६८ (१४-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालगृहांच्या भोजनाच्या अनुदानाची सव्वाशे कोटी रुपयांची रक्कम महिला व बालविकास विभागाने अद्‌याप दिली नसल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनाथ बालकांच्या भोजनासाठी शासनाकडून तातडीने निधी दयावा, अनाथ बालकांना सांभाळण्याऱ्या सेवकांचे वेतन द्‌यावे, अशा विविध मागण्यांसाठी बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटनेने माहे मे-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान बालविकास आयुक्तालय पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनाथबालगृह चालक व कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१०-२०१५) :**(१) सदर प्रकरणी प्रलंबित तसेच चालू अनुदान देण्यासाठी रु.१५६,४५,११,०००/- इतक्या रकमेची पुरवणी मागणी प्रस्ताव सादर केला होता. तथापि, सदरचा प्रस्ताव निधी अभावी मान्य होऊ शकला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) वरील अ.क्र. १ प्रमाणे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात सातत्याने वृक्षतोड करण्यात येत असल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळत असल्याबाबत**

**(१२) १६६७० (१४-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात सातत्याने वृक्षतोड करण्यात येत असून त्या बदल्यात वृक्ष लागवड करण्यात येत नसल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला असून गावोगावी असणारे लाकूडतोड व्यावसायिक वृक्षांची तोड करीत असल्याने वृक्षांची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली असून विशेष म्हणजे तोडण्यास बंदी असलेले चंदन व सागवान झाडाची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी होणारी अवैध वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

मागील ३ वर्षात पंढरपूर तालुक्यामध्ये महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत वृक्षतोडीस परवानगी देण्यात आलेल्या तसेच त्यानुषंगाने लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची संख्या पुढीलप्रमाणे:-

| वर्ष | परवानगी दिलेला वृक्ष प्रकार | वृक्षांची संख्या | परवानगी दिल्यानंतर वृक्ष लागवड संख्या |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | साग | ४७६ | ९५२ |
| २०१३-१४ | | ११०५ | २२१० |
| २०१४-१५ | | ५० | १०० |

(२), (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांबाबत**

**(१३) १६८१७ (१४-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पालकमंत्री यांनी पाहणी करून नाला खोलीकरण पाझर तलावातील गाळ काढणे यासारखी कामे वेगाने करून ही कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना माहे मे-२०१५ मध्ये वा दरम्यान दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे पुर्ण करण्यात आली काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
तिवसा तालुक्यामध्ये जिल्हास्तरीय आढावा बैठकीमध्ये मा. पालकमंत्री अमरावती यांनी सर्व यंत्रणांना पावसाळयापूर्वी जास्तीत जास्त कामे पूर्ण करावी असे निदेश दिलेले आहेत.
(२) तिवसा तालुक्यामध्ये आराखडयानुसार ३७२ कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून त्यापैकी पावसाळयापूर्वी ३३० कामे पूर्ण झाली आहेत.
अमरावती जिल्हयामध्ये आराखडयानुसार एकूण ५६३५ कामे असून त्यापैकी पावसाळयापूर्वी ३४४१ कामे पूर्ण झाली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरु असलेल्या कामांना निधी उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(१४) १६९२८ (१४-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील दोन वर्षापासून कमी प्रमाणात झालेल्या पावसामुळे राज्यात अर्वषणग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असल्याने जमिनीत मुरवुन पाणी पातळी वाढविण्यासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम व विविध योजनांची सांगड घालून राज्यात जलयुक्त शिवार अभियानाचा जोरदार शुभारंभ करण्यात आला व विविध कामांना सुरुवातही करण्यात आली असे असुनही ज्या ठिकाणी या योजनेतंर्गत कामे सुरु करण्यात आली त्या पैकी एकाही ठिकाणी काम करण्यासाठी शासनाचा निधी आला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानात काम करणाऱ्या विविध समित्या असून जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतांत त्यांच्याच सहीने अनेक कामांना मंजूरी

मिळते परंतु वरील कामांचा कार्यारंभ आदेशच मिळत नसल्याने विविध कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) जिल्हास्तरीय कार्यकारी समिती अभियानासंदर्भात अंमलबजावणीबाबत निर्णय घेणे / गावांची / कामांची निवड करणे / त्यांना मान्यता देणे / कृती आराखडा तयार करणे इ. यासंदर्भात काम करते.

या समितीने प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कार्यारंभ आदेश हे अंमलबजावणी यंत्रणेकडून देण्यात येत असतात. ऑगस्ट, २०१५ अखेर राज्यात १,१८,४९९ कामे पूर्ण झाली असून ३१,८३० कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती वनविभागांतर्गत आठ वनपरिक्षेत्र येत असून यापैकी अनधिकृतरित्या पैसे मिळणाऱ्या जागांवर वर्णी लावण्यासाठी वनपिरक्षेत्र अधिकारी मुख्य वनसंरक्षकांवर दबाव आणीत असल्याबाबत

**(१५) १६९६८ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती वनविभागांतर्गत आठ वनपरिक्षेत्र येत असून यापैकी अनधिकृतरित्या पैसे मिळणाऱ्या जागांवर वर्णी लावण्यासाठी वनपिरक्षेत्र अधिकारी मुख्य वनसंरक्षकांवर दबाव आणीत असल्याचे माहे, मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या शासनाने बदल्यांचे जुने नियम मोडीत काढून विभागीय स्तरावर अधिकाऱ्यांना बदली प्रक्रिया राबविण्यास सांगितल्याने सध्या या विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांवर संबंधित लोकप्रतिनिधी, मंत्री दबाव आणत असल्याने काम करण्यास अडथळा येत आहेत हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे का

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१०-२०१५) :**(१) खरे नाही.

(२) "महाराष्ट्र शासकीय सेवकांचे बदली विनियमन व कार्यालयीन कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५" यामध्ये शासकीय सेवकांच्या बदलीसंदर्भातील

तरतूद विहीत करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा भाग म्हणून वन विभागातील विविध संवर्गातील शासकीय सेवकांच्या बदल्या करण्यासाठी शासनाच्या दिनांक २२.०५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये वनवृत्त व राज्यस्तरावरील बदल्यांबाबत क्षेत्रिय स्तरावर अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

याबाबत विभागीय स्तरावर लोकप्रतिनिधी वा मा.मंत्री बदल्यांसाठी दबाव आणत आहेत, ही बाब खरी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) येथील माळीण व आसाणे या गाव हद्दीतील बुद्रा नदी पात्रालगत पाईरडोह या बंधाऱ्यांचे काम अपूर्ण अवस्थेमध्ये असल्याबाबत.**

**(१६) १७६८३ (१७-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) येथील माळीण व आसाणे या गाव हद्दीतील बुद्रा नदी पात्रालगत पाईरडोह या बंधाऱ्यांचे काम अपूर्ण अवस्थेमध्ये मागील अनेक वर्षापासून पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्याचे काम अपुर्ण अवस्थेमध्ये पडू होते या बंधाऱ्यासाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध असतांना या निधी मधून काही प्रमाणात संबंधित ठेकेदाराने काम करून अर्धवट काम सोडून ठेकेदार निघुन गेला असल्याने या परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना शेती व इतर बाबींसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याने शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) होय.

सदरचे काम जानेवारी, २०१० मध्ये सुरु करण्यात आले असून अद्याप पूर्ण झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २००९ अन्वये सदर कामास रुपये ५२५.२९ लक्ष प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. योनजेच्या रस्त्याचे काम, मुख्य धरणाचे जलरोधी खंदकाचे खोदकाम व भराईकाम, धरणाचे बाजू भरावाचे मातीकाम इ.कामे करण्यात आली. मार्च, २०१५ अखेर या कामावर रुपये ५७४.४१ लक्ष इतका खर्च झालेला आहे. कामाचे रुपये १०५५.२४ लक्ष सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुर्लक्षित असलेले पाच व्याघ्र प्रकल्प तसेच अभयारण्याना सशक्त करण्याबाबत.**

**(१७) १८८६४ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्लक्षित असलेले पाच व्याघ्र प्रकल्प तसेच अभयारण्यांना सशक्त करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, या योजनेवर किती खर्च अपेक्षित आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-११-२०१५) :**(१) राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प व ४८ अभयारण्य आहेत, केंद्र शासनाच्या व्याघ्र प्रकल्पाकरिता विशेष व्याघ्र दलाची निर्मिती करण्याचे योजिले असून त्या अनुषंगाने राज्यातील पेंच व्याघ्र प्रकल्प व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकरिता विशेष व्याघ्र दलाची निर्मिती करण्यात आली आहे तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्प व नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र दलाची निर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे,

(२) व्याघ्र प्रकल्प योजना ही केंद्र शासनाची असून त्याकरीता केंद्र शासनाद्वारे अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, त्याकरिता केंद्र शासनाच्या अधिनस्त असलेल्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासोबत राज्य शासनाद्वारे सामंजस्य करार केला जातो, त्या अंतर्गत राज्यातील व्याघ्र प्रकल्पांतील वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनाच्या अनावर्ती बाबींसाठी केंद्र शासन १००% तर आवर्ती कार्यबाबींकरिता केंद्र व राज्य शासन ५०.५० या समप्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो,

विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते हे अनावर्ती बाबीमध्ये येत असून त्याकरिता केंद्र शासन १००% अनुदान उपलब्ध करुन देते,

(३) सन २०१५-१६ मध्ये "व्याघ्र प्रकल्प" योजनेतर्गत राज्यातील ६ व्याघ्र प्रकल्प मिळून रु. २१८८.५८६ लक्षच्या कार्यबाबींना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे.

---

**विदर्भातील मेळघाट, ताडोबा, तुमसर, अकोट परिसरातील वाघांची शिकार करुन त्यांची कातडी नखे, हाडांची जगभर तस्करी करणाऱ्या टोळीबाबत**

**(१८) १९२२१ (१७-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील मेळघाट, ताडोबा, तुमसर, अकोट परिसरातील वाघांची शिकार करुन त्यांची कातडी नखे, हाडांची जगभर तस्करी करणाऱ्या टोळीला दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ च्या सुमारास नवी दिल्ली येथे पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पकडण्यात आलेल्या टोळीने आतापर्यंत राज्यातील किती वाघाची शिकार केल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) वाघाच्या शिकारीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कठोर उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५)** :(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ढाकणा परिक्षेत्रात झालेल्या वाघाच्या शिकारीच्या (प्रथम गुन्हा रिपोर्ट क्र. १०/१०, दिनांक ४ मार्च, २०१३) अनुषंगाने महाराष्ट्रातील वाघ शिकार प्रकरणाचा छडा लावण्याकरिता गठीत Action Team ने दिल्ली येथे दिनांक २४ डिसेंबर,२०१३ रोजी ३ आरोपींना मुद्देमाल व रोख रक्कमेसह अटक केली तथापि १ आरोपी फरार आहे,
(२) दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी जारी प्रथम गुन्हा रिपोर्ट क्र. १०/१० प्रकरण न्यायालयात ६४/२०१४ अन्वये दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने दिनांक १८ जुन, २०१४ रोजी तीन आरोपींना सक्त मजूरीची शिक्षा व रु. ५०,०००/- दंड व एका आरोपीला सक्त मजूरीची शिक्षा व रु. १०,०००/- दंडाची शिक्षा ठोठावली आहे व आरोपींना दोषमुक्त करण्यात आले सदर आदेशा विरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करण्यात आले आहे, उर्वरित ६ आरोपी व १ फरार आरोपी विरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे,
(३) महाराष्ट्रातील वाघ शिकार प्रकरणाचा छडा लावण्याकरीत गठीत Action Team ने महाराष्ट्र पोलीस, वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो (WCCB) व दिल्ली पोलीस मदत घेऊन वाघाच्या अवयवांच्या व्यापर प्रकरणी ११ प्रथम वनगुन्हे नोंदविले असून प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले आहे, राज्यातील २१ आरोपी व परराज्यातील २८ आरोपी यांना अटक करण्यात आली आहे, वाघांच्या शिकारीची ३ प्रकरणे व वाघाचे हाड/अवयव/चामडे तस्करीचा प्रकरण आहेत,
(४) पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर नवेगाव-नागझिरा व मेळघाट व्याघ्र प्रकल्पात देखी STPF तैनात करण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता प्रदान केली आहे.

---

## बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला या कार्यालयाला पूर्वीप्रमाणेच एल वॉड (कुर्ला/पश्चिम) कार्यालयातील जागा मिळणेबाबत

**(१९) १९६३९ (१४-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ''बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला या कार्यालयाला पूर्वीप्रमाणेच एल वॉर्ड (कुर्ला/पश्चिम) कार्यालयातील जागा मिळणेबाबत '' या विषयावरील दिनांक १६ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा. महिला व बाल कल्याण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५)** :(१) होय.

(२) बालविकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला कार्यालयाच्या दि. १६.०५.२०१३, दि.२२.११.२०१३ व दि. ११.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये जागा उपलब्ध करून देण्याबाबत उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला (प) मुंबई यांना कळविण्यात आले आहे. तसेच भेटी व चर्चाद्वारे लवकरात लवकर एल वॉर्ड मधील जागा उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली होती. त्यावर सद्यस्थितीत एल विभाग कार्यालयाच्या इमारतीत जागा उपलब्ध करणे शक्य होत नाही. असे सहा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग, कुर्ला यांनी दिनांक १५.०६.२०१५ च्या पत्रान्वये प्रकल्प कार्यालयास कळविले आहे. मा.सदस्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने याविभागाच्या दि.२५.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना जागा उपलब्ध करून देणेबाबत संबंधीतांना सूचना देणेबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या प्रतिबंधित क्षेत्रातील विविध भागात (ता.अकोट, जि.अकोला) येथील आदिवासींच्या जमिनी लीज वर घेऊन अवैधरित्या गौण खनिजाच्या अनेक खादानी व स्टोन क्रशर असल्याबाबत**

**(२०) १९७६५ (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या प्रतिबंधित क्षेत्रातील भागात मलकापूर, गाजीपूर, पोपटखेड, रुधाटी, लखमापूर, बंधारा (ता.अकोट, जि.अकोला) येथील आदिवासी गावांमध्ये आदिवासींच्या जमिनी लीज वर घेऊन अवैधरित्या गौण खनिजाच्या अनेक खादानी व स्टोन क्रशर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे महसूल व वन विभाग जाणूनबूजून दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५)** :(१), (२) व (३) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोन मध्ये गाजीपूर, रुधाटी, लखमापूर बंधारा ही गावे येत नाहीत. तथापि अकोला वन विभागाचे कार्यक्षेत्र असलेल्या बफर झोनमधील पोपटखेड व मलकापूर भिल येथील खाणीस बफर झोन अधिसूचीत होण्यापूर्वीच महसूल विभागामार्फत परवानगी देण्यात आली असल्याने सदर खाणी सुरु होत्या. दिनांक २७.०८.२०१४ रोजी जिल्हा खाणकाम योजना २०१४ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे बैठक पार पाडली असून सदर बैठकीत पोपरखेड व मलकापूर भिल येथील खाणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर खदानी बंद आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील कर्नाळा अभयारण्यात वारंवार वणवे लागत असल्याबाबत**

**(२१) १९८१० (१७-०९-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्नाळा अभयारण्यात वारंवार वणवे लागत असल्याने तेथील वन्यजीव व वनसंपत्ती नष्ट होत असून पर्यावरणाचे संतुलनही बिघडत आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे वणवे नैसर्गिक नसल्याचा संशय निसर्गप्रेमीमध्ये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संशयानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तसेच वारंवार लागणारे वणवे रोखण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-१०-२०१५) :**(१) कर्नाळा पक्षी अभयारण्यात सन २०१५ मध्ये जमीनीलगत एकूण ६ वेळा आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये जमिनीलगतचा पालापाचोळ्यासह एकूण १४.०० हे. क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

(२) व (३) सदरची आग ही आकस्मिक असून कोणीही जाणीवपूर्वक आग लावल्याचे आढळून आलेले नाही.

(४) वनवणवे रोखण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

- आग प्रतिबंधक जाळरेषा माहे डिसेंबर ते जानेवारी मध्ये घेण्यात आल्यात.
- आगीच्या हंगामात वनाच्या एखाद्या भागात आग लागलीच तर त्याची त्वरीत दखल घेण्याकरिता रोजंदारीवर फायर वॉचर नेमले.
- एखाद्या भागात आग लागलेली आढळल्यास जवळपासचे फायर वॉचर, क्षेत्रिय कर्मचारी व ग्रामपरिस्थिती विकास समितीचे मदतीने आगीवर नियंत्रण केले.
- संरक्षित क्षेत्रातून आग लागलेचे ठिकाण त्वरीत निदर्श्नास येणेकरिता निरीक्षण मनोरे तयार करण्यात आलेले आहेत.
- संरक्षित क्षेत्रातील दुर्गम भागात एकूण १४ संरक्षण कुटी स्थापित करण्यात आलेले आहेत. अशा दुर्गम भागात क्षेत्रिय कर्मचारी वस्ती करुन आळीपाळीने जंगल क्षेत्रातून गस्त करतात.
- तसेच वनात आग लावणाऱ्या गुन्हेगारांवर भारतीय वन अधिनियम १९२७ चे तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत कार्यवाही केली जाते.

---

**गारमाळ (ता.खालापूर, जि.रायगड) येथील डोंगर माथ्यावरील प्राण्यांसाठी वन विभागामार्फत व्यवस्था करणेबाबत**

**(२२) २०१४८ (१७-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गारमाळ (ता.खालापूर ,जि.रायगड) हे गाव डोंगरमाथ्यावर वसलेले असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्राण्यांची वस्ती असून उन्हाळ्यात प्राणी व ग्रामस्थ यांना पाण्याची व्यवस्था गेली अनेक वर्षे वन विभागामार्फत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गारमाळ येथे प्राण्यासाठी व ग्रामस्थांसाठी वन विभाग पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणार आहे काय,

(३) नसल्यास, कारणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :**(१) व (२) मौजे गारमाळ ह्या गावातील लोकांना व प्राण्यांना पाणी पुरवठा करणे हे वनविभागाच्या कार्यकक्षेबाहेर आहे. तथापि मौजे गारमाळ व आसपासच्या जंगल क्षेत्रात आढळून येणाऱ्या वन्यप्राण्यांकरीता मौजे गारमाळपासून अंदाजे २ ते ३ कि.मी. अंतरावरुन वाहत असलेल्या आंबा नदीत पाण्याची उपलब्धतता असून पावसाळ्याच्या कालावधीत पडणाऱ्या पावसामुळे माहे जानेवारीपर्यंत सदर नदी वाहत असते. सदर नदीत नैसर्गिक डोह असून सदर डोहात झऱ्याचे पाणी झिरपत असल्याने पुन्हा पावसाळा सुरु होईपर्यंत ठिकठिकाणी नदी पात्रात मुबलक प्रमाणात पाणी साचलेले असते. सदरचे नदीतील डोहामध्ये पाणी झिरपण्याच्या उद्देशाने वनविभागाने आंबा नदीचे वरील बाजूस असणाऱ्या नाल्यांना दगडी नालाबंध व जलशोषक खंदक घालून पाणी अडवून पाणी जिरवण्याची कामे केलेली असून ते पाणी आंबा नदीतील डोहात साचते. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या मुबलक पाण्याचा साठा उपलब्ध होत असतो म्हणून वेगळ्याने पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर चांदूरबाजार आणि मोर्शी तालुक्यातील मेंढपाळ व्यक्तींना चराई पासेस मिळण्याबाबत**

**(२३) २०४६९ (१७-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय क्रमांक ३२ दिनांक २ ऑगस्ट, १९७१ अन्वये भूमिहिन मेंढपाळ व्यक्तींना प्राधान्यक्रमाने चराई पासेस मिळून त्यांच्याकरिता २५ टक्के चराई क्षेत्र राखीव करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर विधानसभा यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ रोजी मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय क्रमांक तथापि एमएफपी १३६९/६३६९५ झेड, दिनांक ०२.०८.१९७१ मध्ये मेंढी चारणा-यांना किंवा भूमिहीनांनी प्राधान्याने चराई पासेस देण्याबाबत कुठलीही तरतूद नाही. उक्त शासन निर्णयान्वये शासकीय वनक्षेत्रात चराईसाठी गुरांचे प्राधान्य ठरविण्यात आलेले आहे. त्यात मेंढीचा समावेश नाही.

(२) व (३) वनक्षेत्रात गुरे चराई संदर्भात शासन निर्णय दिनांक ०६.१२.१९६८ अन्वये नियमावली तयार करण्यात आलेली आहे. नियम-७ नुसार Grazing in forests by goats should be prohibited altogether for sheep grazing specified area should be set apart and separate incidence and rate of fees fixed after obtaining Government approval''

अमरावती जिल्हयातील शासकीय वन क्षेत्रात मेंढी चराईकरीता वन क्षेत्र उपलब्ध करण्याची सुसाध्यता तपासण्याबाबत शासन निर्णय क्रमांकः- एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक २३.१२.२००३ अन्ये अमरावती, पूर्व मेळघाट व पश्चिम मेळघाट या वन विभागांसाठी चराई जमाबंधी अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर शासन निर्णय क्रमाकः- एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक २१.०३.२००५ अन्वये राज्यात इतर वन विभागासाठी चराई जमाबंदी अधिकारी म्हणून सहाय्यक वनसंरक्षक दर्जाचे अधिका-यांची नियुक्ती करणत आली त्यानुसार सन २००७ मध्ये सदर चराई जमाबंदी अधिका-यांनी शासनास अहवाल सादर केला.त्यावर सर्वकष विचार करुन शासन निर्णय क्रमांकः- एमएफसी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१, दिनांक ०६.०५.२००८ अन्वये राज्यातील ४८ वन विभागातील चराई बंदी अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार अमरावती जिल्हयातील मेंढी चराईकरीता शासकीय वनक्षेत्र उपलब्ध नाही.

---

**आप्पापाडा, मालाड (पूर्व) येथे विकास नियोजन रस्त्यावर वन खात्याच्या जमिनीला लागून असलेल्या भिंतीजवळ खड्डा तयार झाल्याने त्या ठिकाणी झालेले घाणीचे साम्राज्य**

**(२४) २०६२४ (१७-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आप्पापाडा, मालाड (पूर्व), मुंबई पी/उत्तर विभाग, सर्व्हे क्र. २३९ (१)(भाग) हया ठिकाणी विकास नियोजन रस्त्यावर वन खात्याच्या जमिनीला लागून असलेल्या भिंतीजवळ खड्डा तयार झाल्याने त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य झाले असून सदरचा खड्डा बुजविण्यासंदर्भात वन विभागाची परवानगी मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ मार्च, २०१५ रोजी वा मा.वन मंत्री, यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर खड्ड्याची वन विभागाचे व मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २७.०४.२०१५ रोजी संयुक्त पहाणी केली आहे. सदर खड्डा महापालिकास्तरावर बुजविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याबाबत मुंबई महानगरपालिकेला संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कार्यालयाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळवले आहे.

---

**रायगड जिल्हातील कर्जत तालुक्यातील कळंब येथील बालिकेचा कुपोषणाने झालेला मृत्यू**

**(२५) २०९५१ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हातील कर्जत तालुक्यातील कळंब येथील एका सव्वा वर्षाच्या मुस्लिम समाजातील बालिकेचा कुपोषणाने मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) सदर तालुक्यात ८८ कुपोषित बालके आहेत हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा तदनुसार कुपोषित बालकांची संख्या घटावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
संबंधित बालक हे कुपोषित होते. परंतू त्याचा मृत्यू कुपोषणामुळे झालेला नसून मृत्यूचे कारण मुत्रमार्गाचा संसर्ग झाल्यामुळे इतर अवयवही त्यामुळे निकामी झाल्याने मृत्यू झाला असावा, असे वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंब यांनी कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना कर्जत-१ व कर्जत-२ मिळून एकूण सॅम श्रेणातील ४६ व मॅम श्रेणीतील १३८ बालके आहेत. कुपोषित बालकांची संख्या घटावी म्हणून २०१४-१५ मध्ये मध्ये ग्राम बाल विकास केंद्रामध्ये सॅम श्रेणातील ९० व मॅम श्रेणातील २५९ अशा एकूण ३४९ बालकांना दाखल केले होते. त्यापैकी सॅम श्रेणातील ६२ व मॅम श्रेणातील १६६ अशा एकूण २२८ बालकांमध्ये सुधारणा झाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) चिल्हार नदीवर लोभेवाडी पत्राचीवाडी येथे बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्यांना गळती लागल्याबाबत**

**(२६) २०९६७ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) चिल्हार नदीवर लोभेवाडी पत्राचीवाडी येथे २०१२ मध्ये बांधलेला सिमेंट बंधाऱ्याला एप्रिल-मे२०१५ च्या दरम्यान गळती लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाणी गळतीमुळे बंधारा कोरडा पडू लागला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, पाण्याअभावी शेतकऱ्यांचे भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, बंधाऱ्यातील पाणी गळती बंद होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीका बंद राहिल्याने जलयुक्त शिवार अभियांना अंतर्गत वृक्ष लागवडीसाठी जिल्ह्यात रोपे शिल्लक नसल्याबाबत**

**(२७) २१०२७ (१४-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीका बंद राहिल्याने जलयुक्त शिवार अभियांना अंतर्गत वृक्ष लागवडीसाठी जिल्ह्यात रोपे शिल्लक नसल्याची माहिती दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, रोपवाटीका बंद करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,

(४) असल्यास, रोपांची जिल्ह्यात योजनेच्या लागवडीकरीता कमतरता भासत असल्याने नवीन रोपवाटीका सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) रोपवाटीका बंद करण्यात आलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील अजिंठा पर्वत रांगामधील जंगलात प्रचंड वृक्षतोड झाल्याने होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास**

**(२८) २१०७९ (१४-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील अजिंठा पर्वत रांगामधील जंगलात प्रचंड वृक्षतोड झाल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अजिंठा पर्वत रांगाचा ऱ्हास थांबविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच सदर पर्वत रागांमध्ये जलसंधारण व भूमीसंधारणासाठी उपाययोजना हाती घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे किंवा कसे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१०-२०१५) :**(१) बुलढाणा जिल्हयातील अजिंठा पर्वत रांगामध्ये प्रंचड वृक्षतोड होत असल्याने निदर्शनास आले आहे.

(२) अजिंठा पर्वत रांगाचा -हास थांबविण्यासाठी वनअधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत नियमित गस्त घालून अवैध वृक्षतोडीला आळा घालण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच आगीपासून वनांचे रक्षण, जल व मृद संधारणाचे कामे संयुक्त वनव्यवस्थापनाचे माध्यमातून व लोकसहभागातून करण्यात येत असून पर्यावरणाचा -हास थांबवण्याच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) सदर पर्वत रांगामध्ये भूमी व जल संधारण उपाययोजना प्रस्तावित असून विविध योजनामधून सदर कामे करण्यात येत आहे.

---

**सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत**

**(२९) २११११ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजना व इतर माध्यमातून महामार्ग अथवा पोच मार्गाच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जात अाहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण संतुलनासाठी वनस्पती प्रजाती संवर्धन आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, दिर्घ आयुष्य असलेल्या वनस्पती प्रजातींचा त्यामध्ये समावेश आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरण संतुलनासाठी विशेष उपाययोजना व आराखडा तयार करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१५):** (१) सामाजिक वनीकरन विभागामार्फत मुख्य जिल्हा रस्ते पोच मार्ग व इतर मार्गाच्याकडेला वृक्ष लागवड केली जाते.

(२) महामार्गव्यतिरिक्त अन्य जिल्हा रस्ते, तालुका रस्ते, पोच मार्ग इ.च्या कडेला वृक्षलागवडीचा कार्यक्रम स्थानिक परिस्थितीच्या गरजेनुसार घेण्यात येतो. त्या अंतर्गत रस्त्याच्या कडेला अस्तित्वात असलेला झाडोरा वगळून इतर मोकळ्या क्षेत्रात वृक्षलागवड करण्यात येते. त्यामुळे वृक्षलागवडीबरोबरच अस्तित्वात असलेल्या झाडो-याचेसुध्दा संवर्धन होत असते.

वन विभागात वनक्षेत्राकरीता कार्य अयोजना दर दहा वर्षासाठी तयार केली जाते. त्यानुसार वृक्ष लागवडीचे कामे पार पाडली जातात.

(३) होय.

(४) सामाजिक वनीकरणामार्फत घेण्यात येणारा वृक्षलागवड कार्यक्रम हा चार वर्षाचा असतो.तदनंतर सदर वृक्षलागवड ही संबंधित यंत्रणेस पुढील व्यवस्थापनेकरिता हस्तांतरीत करण्यात येते. सन २०१५-१६ मध्ये राज्यातील १३९० कि.मी. सन २०१६-१७ मध्ये २००० कि.मी. सन २०१७-१८ मध्ये १३०० कि.मी. असे एकूण ४६०० कि.मी. रस्ता दुतर्फा वृक्षलागवड कार्यक्रम राज्य वार्षिक योजना अंतर्गत मंजूर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोरेगांव पूर्वेकडील दिंडोशी आयटी पार्कच्या मागील भागातील सुमारे २५ एकरचा हरित पट्टा नष्ट करण्यात येत असलेल्या तक्रारीबाबत**

**(३०) २१३७१ (१४-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या काही वर्षापासून गोरेगांव पूर्वेकडील दिंडोशी आयटी पार्कच्या मागील भागातील सुमारे २५ एकरचा हरित पट्टा नष्ट करण्यात येत असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी सहाय्यक वनसंरक्षकाची नियुक्ती करण्यात आल्याची बाब माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्राप्त असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, प्राप्त निष्कर्षाच्या अनुषंगाने हरित पट्टा नष्ट करणा-या वा जबाबदार असणा-या दोषी व्यक्तींवर व विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत मुख्य वन संरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ह्यांनी सहाय्यक वनसंरक्षकांना चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.
(२), (३) व (४) सदर चौकशीत दिंडोशी आयटी पार्कच्या मागील क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाहेरील खाजगी क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे क्षेत्र खाजगी क्षेत्र असल्याने वन विभागामार्फत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील तसेच इको सेन्सिटिव्ह झोनमधील स्थानिक जनतेवर लादलेल्या जाचक अटी व बंधने रद्द करणेबाबत**

**(३१) २१८८८ (१७-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण तालुक्यात केंद्र व राज्य शासनाने सह्याद्री व्याघ्र प्रकल्प व इको सेन्सिटिव्ह झोन घोषित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह्याद्री प्रकल्प व इको सेन्सिटिव्ह झोन मध्ये पाटण तालुक्यातील या विभागातील स्थानिक जनतेवर या प्रकल्पाच्या दृष्टीने अनेक जाचक अटी व बंधने लादण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकल्पातील बाधित जनतेवर लादलेल्या जाचक अटी तसेच बंधने रद्द करणेबाबत राज्य शासनाकडे तसेच केंद्र शासनाकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास राज्य शासनाने सदरच्या जाचक अटी व बंधने रद्द करणेसंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे,
(५) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) शासन अधिसूचना क्रमांक : डब्ल्यूएलपी २०१२/प्र.क्र.२४०/फ-१, दिनांक २१.०८.२०१२ अन्वये सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा कोअर व बफरझोन क्षेत्र घोषित करण्यात आलेले आहे. तथापि इको सेन्सिटिव्ह झोन अद्याप घोषित करण्यात आलेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) वन कर्मचाऱ्यांच्या पथकाने देवलापर येथील एका वन कर्मचाऱ्यांच्या घरावर धाड टाकून सागवान लाकूड जप्त केल्याबाबत**

**(३२) २२३७९ (१४-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) वन कर्मचाऱ्यांच्या पथकाने देवलापर येथील एका वन कर्मचाऱ्यांच्या घरावर धाड टाकून माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सागवान लाकूड जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये पारशिवणी (जि.नागपूर) वन कर्मचाऱ्यांच्या पथकाने देवलापार येथीलश्री.दियाकचंद शिवलाल शिवने, वनमजूर, छवारी बिट यांच्या घरी धाड टाकून त्यांचे घरात साठवून ठेवलेले ६६ नग साग चिराण ०.६७४ घन मीटर एवढा माल जप्त केला आहे.

(२) श्री.दियाकचंद शिवलाल शिवने, वनमजूर, छवारी बिट यांच्या विरुध्द वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१) अ, २६(१) ई, ४१ व ४२ अन्वये वनगुन्हा क्रमांक १४/९ दिनांक ०२.०२.२०१५ रोजी नोंदविला आहे. श्री.शिवने यांना दिनांक २३.०२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यातील पाणलोट व शेततळयाच्या कामामध्ये प्रचंड प्रमाणात झालेल्या गैरव्यवहार**

**(३३) २२८८१ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यातील पाणलोट व शेततळयाच्या कामामध्ये प्रचंड प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून करोडो रुपयांची वसुली करण्याचे निर्देश दिले गेले आहे. परंतु, अद्यापही या रक्कमेची वसुली करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराच्या वसुलीच्या प्रकरणात दोषींना अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन काही कठोर कारवाई करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) होय. अंशत: खरे आहे.
(२) व (३) याप्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूली करण्याकरिता जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांचे स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी येथील कसई-दोडमार्ग मधील वनविभागाच्या जमीनीत केरळीयन व्यक्तीने अतिक्रमण करुन बेकायदा वृक्षतोड केल्याबाबत**

**(३४) २३५१६ (१४-०८-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी येथील कसई-दोडमार्ग मधील वनविभागाच्या सुमारे १५०० एकर जमीनीत केरळीयन व्यक्तीने अतिक्रमण करुन बेकायदा वृक्षतोड, सपाटीकरण व शेड उभारले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमीनीच्या सातबारावर महाराष्ट्र शासन राखीव वन म्हणून नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या वनजमिनीवर अतिक्रमण करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :**(१) मौजे कसई (ता.दोडामार्ग), रत्नागिरी जिल्ह्यात नसून सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. कसई स.क्र. १५२/१ मधील ८.१० हे. क्षेत्रापैकी सुमारे १.०० हे.आर क्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड आढळून आली. सदर क्षेत्रात सपाटीकरण करणेत आलेले नाही. परंतु साधे शेड उभारण्यात आले होते. सदर शेड माहे फेब्रुवारी मध्ये वनपाल मणेरी, वनसंरक्षक कसई यांनी तात्काळ काढून टाकली असून त्याबाबत दिनांक १८.२.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

अवैध वृक्षतोडीमध्ये इजायंली जातीची १८९ बुडे आढळून आली. बुडावरील नुकसानी रू.२७,०३१/- असून जागेवर ठिकठिकाणी गोळा करून ठेवलेला इंजायली जळावू किंटा १८.००० घ.मी. इतका माल मिळाला असून त्याची किंमत रूपये २२,६८०/- एवढी आहे. सदर माल जप्त करून सरकार जमा करून विक्री आगार दोडामार्ग येथे वाहतूक करणेत आलेली आहे.
(२) दोडामार्ग परिक्षेत्रातील कसई येथील सर्व्हे क्र. १५२/१ क्षेत्र ८.१० हे. वनक्षेत्राची सावंतवाडी वनविभागातील नमुना नंबर १ मध्ये नोंद असून ते महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अंतर्गत चौकशीवर प्रलंबित आहे. दिनांक १४ जुलै, २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार या क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यावरी, भोगवटादार सदरी महाराष्ट्र शासन राखीव व वन इतर अधिकारा मध्ये महाराष्ट्र शासन वन विभाग जमीन खाजगी वन कायद्याखाली

संपादन करण्यासाठी असा शेरा आहे. तसेच इतर अधिकारामध्ये गणेश भालचंद्र स्वार, शंभा दत्ताराम स्वार, विनीता शंभा स्वार इ.खाजगी व्यक्तींची नावे आहेत.
(३) मौजे कसई येथील स.क्र. १५२/१ या शासनाचे जमिनीवर तात्पुरते शेड उभारले होते, ते निदर्शनास येताच काढून टाकण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (पूर्व) जि. पालघर कामण गावातील खिंडीपाडा येथे कस्टम अधिकाऱ्यांना विविध प्रजातीच्या लाकडाचे कंटेनर आढळून आल्याबाबत**

**(३५) २३९८३ (१४-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वसई (पूर्व) जि.पालघर कामण गावातील खिंडीपाडा येथे दिनांक २ जून २०१५ रोजी कस्टम अधिका-यांना विविध प्रजातीच्या लाकडाचे कंटेनर आढळून आले. त्यात ८२ लाख किंमतीचे विविध प्रजातीचे लाकूड असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कस्टम अधिका-यांनी मांडवी वन विभागाशी संपर्क साधला, त्यानुसार मांडवी परिक्षेत्र मंडळाच्या अधिका-यांनी कंटेनर जप्त केली असे दिनांक ६ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१०-२०१५) :**(१) व (२) ठाणे वनविभागातील वसई (पूर्व) जि.पालघर कामण गावातील खिडींपाडा येथे डायरेक्टर, रेव्हेन्यु, इंटलिजेन्स, मुंबई झोन, युनिट टी.आर.आर. यांनी एक बेवारस ट्रेलर कंटेनर दिनांक २ जून, २०१५ रोजी ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी वनक्षेत्रपाल, मांडवी यांच्या ताब्यात दिला आहे. यामध्ये रक्तचंदन/शिसम या जातीचा वनोपज आढळून आला आहे. सदरहू जप्त मालाचे नमूने तपासणीसाठी Center forensic Science Laboratory, Hydrabad येथे वैज्ञानिक तपासणीसाठी पाठविण्यात आलेले असून त्याची प्रजाती व प्रतवारी निश्चित केल्यानंतर त्याचे मूल्य ठरविले शक्य होईल.
(३) सदर कंटेनरमधील हे वनोपज जप्त करुन दि.२ जून, २०१५ अन्वये वनगुन्हा नोंदविला असून एका आरोपीला अटक करण्यात आली. सदर आरोपीस वसई कोर्टात हजर करण्यात आले असता त्यास दिनांक ६.६.२०१५ पर्यंत वन कोठही देण्यात आली होती. पुढील तपास करण्यात येत आहे.

---

**पुणे व रायगड जिल्ह्यांच्या सीमेवरील ताम्हिणी अभयारण्याच्या संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्याबाबत**

**(३६) २४१२६ (१४-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व रायगड जिल्हयांच्या सीमेवरील ताम्हिणी अभयारण्याच्या संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी सुमारे अडीच वर्षानंतरही पुरेसा कर्मचारीवर्ग नियुक्त करण्यात आलेला नसल्याची बाब माहे एप्रिल २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभयारण्याच्या परिसरात इको सेन्सेटिव्ह झोन निर्माण करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५)** :(१) ताम्हिणी वन्यजीव अभयारण्याच्या व्यवस्थापनासाठी पुणे वन विभागातील ७ व रोहा वनविभागातील ४ अशी एकूण ११ पदे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांच्याकडे वर्ग करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे,
(२), (३) व (४) पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे

---

### पुणे जिल्हयात निम्म्या अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नसल्याबाबत

**(३७) २४२६५ (१७-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा नविन वर्षात जिल्हयातील अंगवाड्यांना कायापालट करुन त्या अंगणवाड्या करण्याचा ध्यास जिल्हा परिषदेने घेतला असला तरी जिल्हयातील जवळपास निम्म्याहून अंगणवाड्यांना स्वतःची इमारतच नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४५७० पैकी २३३४ अंगणवाड्यांना इमारत आहे, तर २२३९ ठिकाणी इमारतच नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील शाळा या समाजमंदिर, खाजगी शाळा, मंदिर, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत या ठिकाणी भरत आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अंगणवाड्यांना हक्काची इमारत उपलब्ध करुन देणे बाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुणे जिल्हयासाठी सन २०१५-१६ मध्ये ४५७० अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी २३३४ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत आहे व उर्वरित २२३६ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नाही.
(३) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये एकूण ४५७० अंगणवाडी केंद्र कार्यान्वित असून २३३४ अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती आहे उर्वरित २२३६ अंगणवाडी केंद्र हे जिल्हा परिषद मालकीच्या म्हणजेच समाजमंदिर २५७, खाजगी व इतर ७१३, मंदिर-११२, प्राथमिक शाळा ८३२, ग्रामपंचायत ३२२ या ठिकाणी भरतात.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत प्रत्येक वर्षी जिल्हा नियोजन समिती, आदिवासी उपयोजना अंतर्गत अंगणवाडी इमारत बांधकामांना निधी उपलब्ध करुन दिला जातो.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्य विकासाकरिता ३० कोटीचा आराखडा सादर करण्यात आल्याबाबत**

**(३८) २४३९३ (१७-०९-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्य विकासाकरिता ३० कोटीचा आराखडा सादर करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभयारण्यातील कच्च्या रस्त्यावर मुरुम टाकण्याचे कामामध्ये ८ दिवस ५८ लाखांचा खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन वन परिक्षेत्रपाल श्री एस.एस.पाटील यांच्या संगनमताने कंत्राटदारांने चुकीचे काम केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, चुकीचे काम करणारे वन क्षेत्रपाल व कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राधानगरी अभयारण्यात पाटपन्हाळा हे इदरगंज पठार भाग-१ व भाग-२ भांडणे गेट ते सीतेचा माळ भाग-२ असे ३ भागात कच्च्या रस्त्यावर मुरुम टाकण्याचे काम ४३ दिवसांत पूर्ण करण्यात आले असून त्यावर अंदाजपत्रकीय बाबींनुसार रु. ४४.४३ लक्ष खर्च झाला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंबडावाडी (ता.चांदगड,जि.नाशिक) येथे विहिरीत पडलेल्या दीड वर्षीय बिबट्याचा मृत्यु झाल्याबाबत**

**(३९) २४४५५ (१७-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंबडवाडी (ता.चांदगड,जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या विहिरीत पडलेल्या दीड वर्षीय बिबट्याचा वन अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेची शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे, वा करीत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५)** :(१) मौजे कोंबडवाडी ता. चांदवड, जि.नाशिक येथील श्री.अंकुर कासलीवाल यांचे मालकीच्या विहीरीत पडून दिनांक ११.०३.२०१५ रोजी बिबट मृत झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

तथापि, सदर बिबट्याचा मृत्यू वन अधिका-यांचे ढिसाळ नियोजन व हलगर्जीपणामुळे झालेला नाही.
(२) व (३) बिबट विहीरीत पडल्याची बातमी मिळताच उववनसंरक्षक, पश्चिम नाशिक यांचेकडील रेस्क्यू पथकाने घटनास्थळी तात्काळ जाऊन विहीरीत पडलेल्या बिबटयास विहीरीतून बाहेर काढण्याची कार्यवाही सुरु केली.

विहीर बरीच खोल असल्याने बिबट्यास विहीरीवरुन ट्रान्क्युलाईज करणे शक्य नव्हते. म्हणून, क्रेनचे सहाय्याने एक रिकामा पिंजरा बिबट बसलेल्या कपारीसमोर सोडण्यात आला. तथापि बराच कालावधी होऊनही बिबट विहीरीत सोडलेल्या रिकाम्या पिंजरा वर घेण्यात आला. क्रेनच्या आवाजामुळे सदर बिबट्याने भितीपोटी विहीरीतील पाण्यात उडी मारली. त्यामुळे तो विहीरीतील गाळात रुतला असल्याने विहीरीतील पाणी उपसण्यात आले. विहीरीतून बिबट्या बाहेर काढल्यावर तो हालचाल करत नव्हता. स्थानिक पशुवैद्यकीय अधिका-यांकडून बिबट्याची तपासणी केल्यानंतर त्यास नाशिक येथे आणून सहाय्यक पशु आयुक्त, पशुवैद्यकीय चिकीत्सालय नाशिक यांनी तपासणी केली असता सदर बिबट्याचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले. सदर घटनेत कोणीही शासकीय अधिकारी/कर्मचारी वा अन्य कोणी जबाबदार नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माहिम येथील बालसुधारगृहातील कैद्यांमध्ये झालेल्या मारहाणीत अंमली पदार्थ विक्रीच्या संशयावरुन अटक केलेल्या एका बाल गुन्हेगाराचा झालेला मृत्यू**

**(४०) २४५०९ (१७-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिम येथील बालसुधारगृहातील कैद्यांमध्ये झालेल्या मारहाणीत अंमली पदार्थ विक्रीच्या संशयावरुन अटक केलेल्या एका बाल गुन्हेगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी पुढे काय कारवाई करण्यात आली आहे,
(४) अद्याप चौकशी वा कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

माहिम येथील सुधारगृहातील प्रवेशीत नामे अमिर खान वय १७ वर्षे यास अंमली पदार्थ विक्रीच्या संशयावरुन अटक केलेली नव्हती. तर सदर प्रवेशीतांस चोरीच्या संशयावरुन (आय.पी.सी.कलम ३७९) खाली अटक केली होती.

दि.१८ मे, २०१५ रोजी सदर प्रवेशित संस्थेतून पळून जात असताना इतर प्रवेशितांनी त्यास पकडून मारहाण केली असल्याचे निष्पन्न झालेले आहे. मात्र, बाल न्याय मंडळ यांचेकडून जामिन मंजूर झाल्यामुळे दि.२० मे, २०१५ रोजी त्याला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. सदर प्रवेशित दि.२० मे, २०१५ पर्यंत संस्थेत होता, त्या कालावधीत त्याने मारहाण झाली असल्याची तक्रार केलेली नाही. पालकांच्या ताब्यात दि.२० मे, २०१५ रोजी नायर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वेद्यकीय उपचारदरम्यान दि.२८ मे, २०१५ रोजी त्याचा मृत्यू झालेला आहे. सदर प्रवेशिताचा मृत्यू संस्थेच्या आवारात किंवा संस्थेत दाखल असताना झालेला नाही.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी संस्था स्तरावर विभागीय उपआयुक्त, म.व.बा.वि. पोलिस विभाग व बाल न्याय मंडळ, मुंबई शहर/ मुंबई उपनगर यांनी केलेली आहे तसेच प्रकरणी. मा उच्च न्यायालयास सुमोटो पीआयएल याचिका दाखल असून प्रकरणाचा अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

संस्था स्तरावर नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार प्रवेशित अमिर खान यास ज्या दिवशी मारहाण झाली तेव्हा कर्तव्यावर हजर असलेले श्री.बी.बी.रावळ (गृहपाल) श्री.आप्पासाहेब वरकड (रक्षक) यांना सेवेतून निलंबित केलेले आहे. तसेच, श्री.तुषार भिलावेकर (अधिक्षक) यांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत १५ पदे रिक्त असल्याबाबत**

**(४१) २४६०५ (१४-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत जवळपास १५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांची तातडीने भरती करण्यात यावी अशा प्रकारची मागणी देखील महिला व बालकल्याण समितीच्या माहे २०१५ मध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही रिक्त पदे भरण्याचे दृष्टीने शासनाने कार्य कार्यवाही केली वा केली जात आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) सद्यस्थितीत महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत गट-ब च्या रिक्त पदांची संख्या अधिक आहे. तसेच ग्राम विकास विभागाकडून दिनांक २८/०५/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार विभागाकडे गट ब ची एकूण ४४९ पदे वर्ग करण्यात येणार आहेत. त्यापैकी ३६४ गट-ब पदे वर्ग झाली आहेत. परंतु फक्त ९६ अधिकारी वर्ग झाले आहेत. त्यामुळे रिक्त पदांची संख्या अधिक आहे. सदर रिक्त पदांपैकी सरळसेवेच्या कोटयातील १४७ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास एप्रिल, २०१४ ला मागणीपत्र दिले असून आयोगाने जाहीरात प्रसिध्द केली आहे. तसेच १८८ पदे सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने प्रतिनियुकतीने भरण्यात येणार असल्याचे दिनांक ९/४/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागांना कळविण्यात आले आहे. संबंधित तालुक्यांच्या सहायक गट विकास अधिका-यांकडे रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याच्या सूचना या विभागाच्या दिनांक २८/५/२०१५ च्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत.

---

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील गावांचा इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये समावेश करण्यात आल्याबाबत

**(४२) २४९६१ (३१-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीसह ४८ महसूली गावांचा इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत इको सेन्सिटीव्हबाबतचे किती वस्तूनिष्ठ अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनास सादर केले आहेत व त्यानुषंगाने अधिकच्या कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत व अहवालाच्या अनुषंगाने आतापर्यंत किती जनसुनावण्या घेण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सदर इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये अटी व शर्तीचे पालन न करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली येत आहे,

(४) अद्याप शासनास प्राप्त झालेल्या अहवालानुसार कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५)** :(१) व (२) पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत डॉ. कस्तुरीरंगन ह्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय गटाने केंद्र शासनास सादर केलेल्या अहवालानुसार कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ४८ महसूली गावांचा पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात समावेश आहे,

पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या उपरोक्त सर्व ४८ गावात प्रत्येकी एकेक जनसुनावणी घेण्यात आली आहे, जिल्हा प्रशासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात असणाऱ्या समाविष्ट सर्व गावांच्या परिसंवदेनशिल क्षेत्राचे सिमांकन व पडताळणीचा एकत्रित

अहवाल राज्य समितीला सादर केला आहे, राज्यस्तरीय समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने राज्य शासनाने पश्चिम घाट क्षेत्रातील परिसंवेदनशील क्षेत्राबाबतचा अहवाल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील ३१ गावे परिसंवेदनशिल क्षेत्रात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे,

(३) व (४) केंद्र शासनामार्फत पश्चिम घाट परिसंवेदनशील क्षेत्रा संबंधीची अंतिम अधिसूचना अद्यापि प्रसिध्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये अटी व शर्तीचे पालन न करणाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहर आणि उपनगरात नोकरी करणाऱ्या महिलांसाठी शासकीय वसतीगृह वाढविण्याबाबत**

**(४३) २५१०६ (१४-०८-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात महिलांसाठी शासकीय वसतीगृहाची संख्या ही ११ असून वसतीगृहामध्ये प्रवेश घेणा-या महिलेला सेल्फ डिक्लरेशनचा अधिकार देण्यात आलेला नाही तसेच हॉस्टेलमध्ये महिलांना निवृत्त होईपर्यंत नव्हे तर वयाच्या केवळ पन्नास वर्षापर्यंत राहता येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या मानाने हॉस्टेल्सची संख्या अल्प असूनही निवृत्तीला केवळ ८ ते १० वर्षे बाकी असताना महिलांना पुन्हा नव्याने निवासाची सोय करावी लागते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विमेन्स हॉस्टेलची संख्या वाढविण्याबाबत व महिलांना डिक्लरेशनचा अधिकार व निवृत्त होईपर्यन्त राहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :**(१) अंशत: खरेआहे.

मुंबई शहर आणि उपनगरात एकूण १२ नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे कार्यरत आहेत. नोकरीकरणाऱ्या महिलांना ३ वर्षापर्यंतच वसतिगृहात राहता येईल. अपवादात्मक परिस्थितीत जिल्हा महिला कल्याण समितीच्या परवानगीने ६ महिन्यांनी एका वेळेस निवासाचा कालावधीत वाढवता येईल. परंतु राहण्याचा कालावधी ५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही तसेच नोकरीसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या महिलेस १ वर्षासाठीच वसतिगृहात राहता येणार आहे.

(२) राज्यात कार्यरत असलेल्या सर्व नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृहे हे केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत कार्यरत असून याबाबत केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार कार्यरत आहेत. केंद्र शासनाने जून, २०१५ मध्ये नव्याने लागू केलेल्या योजनेनुसार नोकरी करणाऱ्या महिलांना ३ वर्षापर्यंतच वसतिगृहात राहता येईल. अपवादात्मक परिस्थितीत जिल्हा महिला कल्याण समितीच्या परवानगीने ६ महिन्यांनी एका वेळेस निवासाचा कालावधी

वाढवता येईल. परंतु राहण्याचा कालावधी ५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही तसेच नोकरीसाठी प्रशिखण घेणाऱ्या महिलेस १ वर्षासाठीच वसतिगृहात राहता येणार आहे. महिलेसोबत तीची १८ वर्ष वयापर्यंतची मुलगी व ५ वर्षापर्यंतचा मुलगा देखील वसतिगृहात राहू शकतो.
(३) राज्यात कार्यरत असलेले सर्व नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृहे हे केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत कार्यरत असून याबाबत केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या योजनेनुसार राबविणे बंधनकारक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा व चंदगड येथील जंगलाना सातत्याने आग लागत असल्याने वनसंपदेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत**

**(४४) २५५४० (१७-०९-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा व चंदगड हे दोन्ही तालुके निसर्गरम्य आणि जंगल संपत्तीने परिपुर्ण असून संदर जंगलाना सातत्याने आग लागत असल्याने वनसंपदेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही तालुक्यात आग लागून जंगलसंपत्तीचे नुकसान होत असल्याने उपाययोजना करण्याची मागणी मा.वन मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी दि.१५/६/२०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-१०-२०१५) :**(१) आजरा वनपरिक्षेत्रात एकूण १७५६०.३६ हे. जंगल क्षेत्र आहे व चंदगड वनपरिक्षेत्रात एकूण १३९१० हे. जंगल क्षेत्र आहे. वरील वनक्षेत्रात जळीताच्या घटना किरकोळ स्वरुपाच्या असून झालेली नुकसानी अल्प प्रमाणात आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वनक्षेत्रात आगी लागू नयेत म्हणून पुढील प्रमाणे उपाययोजना केल्या जातात.

- वनहद्दी व मालकी क्षेत्राच्या बाजूने तसेच रस्त्याच्या बाजूने ३ मी, ६मी, १२मी, रुंदीच्या जाळरेषा घेण्यात येतात.
- प्रत्येक नियतक्षेत्रासाठी दोन फायर वॉचर याप्रमाणे सर्व नियतक्षेत्रावर फायर वॉचर नेमून आगीच्या घटना घडू नये म्हणून दक्षता घेतली जाते.
- जंगलामध्ये ठिकठिकाणी वॉच टॉवर निर्माण केलेले आहेत.
- वनामध्ये आगी लागू नये म्हणून पोस्टर्स छापून ग्रामसभा घेऊन लोकांच्या मध्ये जनजागृती करण्यात येते.

- संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची मदत घेण्यात येते.
- आग लागल्याचे निदर्शनास येताच वनकर्मचारी व ग्रामस्थ यांच्या मदतीने तात्काळ आगीवर नियंत्रण ठेऊन आग विझवली जाते.
- गुप्तसेवा निधी अंतर्गत जळीताची बातमी देणा-यास बक्षीस म्हणून अनुदानाचे वाटप होते.
- कोल्हापूर वनविभागामध्ये कुठेही वणवा लागल्यास त्याची नेमकी माहिती मिळवण्यासाठी विभागीय कार्यालयात नियंत्रण कक्षाची स्थापना करणेत आलेली आहे. सदर नियंत्रण कक्ष चोवीस तास कार्यान्वित आहे.

---

**पाठसांगवी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांच्या शेतालगत सिमेंट बंधाऱ्याचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत**

**(४५) २६१३६ (१७-०९-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाठसांगवी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील श्री.जयसिंग किलबीशे यांच्या शेतालगत सिमेंट बंधाऱ्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याने त्याची चौकशी करणे बाबत परिसरातील विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांद्वारे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी व त्या सुमारास जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणती व केव्हा कार्यवाही करणार ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

सदरील कामाबाबतचे निवेदन दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना प्राप्त झाले आहे.

(२) उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे उपविभाग, परंडा, जिल्हा परिषद यांनी सदर कामाची क्षेत्रिय पाहणी दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी केली असून काम गुणवत्तेनुसार झालेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर आणि नगर जिल्हयंतील माळढोक अभयारण्यासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे काकडे कमी करण्यासंदर्भात राज्यशासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविल्याबाबत**

**(४६) २६३८४ (१०-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर आणि नगर जिल्हयंतील माळढोक अभयारण्यासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे आकडे कमी करण्यासंदर्भात राज्यशासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अभयारण्याचे बाधित झालेल्या शेतक-यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, पाठपुरावा केला नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०१५) :**(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा, कर्जत व सोलापूर जिल्हयातील उत्तर सोलापूर, माढा, मोहोळ व करमाळा तालुक्यातील राखीव वनक्षेत्र व गायरान /शासकीय क्षेत्र तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील ४.७३ चौ.कि.मी. इतके खाजगी क्षेत्र असे एकूण ३६६.६६ चौ. कि.मी. क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्याकरिता पुनर्गठीत करण्याच्या प्रस्तावास राज्य वन्यजीव मंडळाच्या दि. २० फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार दि.०४ जुन, २०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी राष्ट्रीय वन्यजीप मंडळाकडे पाठविला आहे.

(२) सदर प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या बैठकीत ठेवण्याबाबत राज्य शासनाचे पत्र दि.१९ जानेवारी, २०१५ व ०४ फेब्रुवारी, २०१५ अन्वये विनंती करण्यात आली. त्यानुसार दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी झालेल्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या ३३ व्या बैठकीत हा प्रस्ताव चर्चेला आला असता समितीच्या अध्यक्षांनी सदर प्रस्ताव पुन्हा एकदा राज्य शासन दाखवून भविष्यात होणाऱ्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावे अशा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर मा. मुख्यमंत्री हयांच्या दि.२२ मे, २०१५ व २८ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये अभयारण्य क्षेत्र ३६६.६६ चौ. कि.मी. ठेवण्याबाबतच्या शासनाच्या भूमिकेचा पुनरुच्चार करुन हयाबाबत लवकर निर्णय घेण्याबाबत मा.राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) पर्यावरण, वन व वातावरण बदल यांना विनंती करण्यात आली आहे.

दि.१८.०८.२०१५ रोजी झालेल्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या ३५ व्या बैठकीत हया विषयावर चर्चा होऊन मंडळाचे सदस्य डॉ.एच.एस.सिंग हयांच्या नेतृत्वाखालील गटाला सदर प्रस्तावाची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना आणि चांदोली अभयारण्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या सीमांवर असलेल्या पवनऊर्जा प्रकल्पामुळे वन्य जीवांवर तेथील पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचा शोध घेण्यासाठी एक अभ्यास गटाची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४७) २६४९६ (१७-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा, सांगली, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्हयात कोयना आणि चांदोली अभयारण्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या सीमांवर असलेल्या पवनऊर्जा प्रकल्पामुळे वन्य जीवांवर तेथील पर्यावरणावर काय परिणाम होत आहे याचा शोध घेण्यासाठी शास्त्रीय पध्दतीवर आधारित पाच तज्ञाचा एक अभ्यास गटाची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व सदर अभ्यास गटाची नियुक्ती केली आहे काय,

(३) अद्यापही या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१५) :**(१), (२) व (३) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत महाराष्ट्रातील पवन उर्जा प्रकल्पांसाठी वनक्षेत्र वळतीकरणाचे अनेक प्रस्ताव सादर केले जातात. वनक्षेत्रावरील पवन उर्जा प्रकल्पांचा वन, पर्यावरण व वन्यजीवांवर होणाऱ्या परिणामांचा शास्त्रोक्त अभ्यास करण्याच्या आवश्यकतेबाबत पवन उर्जा क्षेत्रातील तज्ञ तसेच वन, पर्यावरण व वन्यजीव क्षेत्रातील तज्ञांची समिती नियुक्ती करुन सदर समितीकडून प्राप्त होणारे निष्कर्ष व शिफारशीनुसार या विषयी धोरण निश्चित करण्याची प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १७.४.२०१४ रोजीच्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे त्या अनुषंगाने २६.०८.२०१४ च्या शासन पत्रान्वये पवन उर्जा प्रकल्पांबाबत वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित झाल्या आहेत किंवा कसे, याबाबत केंद्रिय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांना विचारणा करण्यात आली आहे.

---

**किनवट (जि.नांदेड) शहरात सागवान वृक्षांची सर्रास ताड होऊन लाकडाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याबाबत**

**(४८) २६७८७ (१७-०९-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहरात सागवान वृक्षांची सर्रास तोड होऊन दुचाकी, तीन चाकी, चार चाकी शासकीय निमशासकीय व खाजगी जड वाहनांनी या लाकडाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागवान तस्करीकरिता रेल्वेचा वापर करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी आतापर्यंत किती गुन्हे स्थानिक पोलिस स्थानकांत दाखल करण्यात आले,
(४) असल्यसा, त्याचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५)** :(१) किनवट वन परिक्षेत्रामध्ये चिखली वनउपज तपासणीनाका किनवट येथे अवैध सागवानाचे वाहतूकीचा गुन्हा दिनांक १.५.२०१५ रोजी नोंदवून सागवान २५ नग २,४५७ घ.मी. रु.६०,६८५/- इतक्या किंमतीचा माल पिकअप जीपसह जप्त करण्यात आलेला आहे.
(२) दिनांक १७.३.२०१५ रोजी गाडी क्र. १७४०६ कृष्णा एक्सप्रेसच्या रेल्वे पार्सल डब्यामुळे रात्री ११.५० वाजता बोगीमध्ये प्लास्टीकचे बॅगमध्ये विना परवाना वाहतूक होत असलेला सागावन माल मुदखेड रेल्वे स्थानकावर वन अधिकारी, रेल्वे अधिकारी व रेल्वे पोलीस अधिकारी यांच्या समक्ष जप्त करण्यात आलेला आहे. अवैध वाहतूक होत असलेला सागवान माल वनपरिमंडळ अधिकारी, मृदखेड यांनी दिनांक १९.३.२०१५ रोजी ताब्यात घेतलेले आहे. सदरील जप्त केलेल्या मालामध्ये सागवान कटसाईज ४७९ नग असून याची किंमत रु.१२,११८/- एवढी आहे. सदरील जप्त केलेला माल भोकर शासकीय आगारावर जमा केलेला आहे.
(३) अवैध वाहतूकीचे वन गुन्हे स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे डोंगरशेवली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे**
**वन्य प्राण्यामुळे पिकांचे झालेले नुकसान**

**(४९) २७३०६ (१७-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे डोंगरशेवली (ता.चिखली, जि.बुलढाणा) व इतर गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान वन्य प्राण्यापासून झाले असल्याने शेतकऱ्यांनी वन परीक्षेत अधिकारी बुलढाणा यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना वन्य प्राण्यापासून झालेल्या पिकांच्या नुकसानीचा मोबदला नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कुठलीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबणाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५)** :(१) मौजे डोंगरशेवली शिवारातील गावांमधील शेतीचे वन्यप्राण्यांमुळे नुकसान झाल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये ४ शेतक-यांनी नुकसान भरपाई मिळण्याबाबत अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), बुलढाणा यांचेकडे दिले आहेत.

(२) वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्या प्रकरणी प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वेतन व व्यवस्थापकीय संचालक भत्ता वाढविण्याबाबत**

**(५०) २७४७० (१७-०८-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला आर्थिक विकास महामंडळ हे एकमेव महामंडळ महिलांकरीता अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या महामंडळा अंतर्गत महिलांचे प्रश्न सोडविण्यास शासनाला मदत मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामंडळात अधिकारी व कर्मचारी यांना वेतन व व्यवस्थापकीय संचालक भत्ता इतर महामंडळापेक्षा सर्वात कमी मिळतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर महामंडळांना वेतन व व्यवस्थापकीय संचालक भत्ता हा त्यांच्या मागणीनुसार १० ते २० कोटी रुपये मिळतो तर महिला आर्थिक विकास महामंडळाला हाच भत्ता १८ कोटी रुपये मागणी असतानाही केवळ १ कोटी रुपये मिळतो, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन हा भत्ता वाढविण्याकरीता कोणती कार्यवाही करीत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१०-२०१५) :**(१) शासनाच्या दि.२० जानेवारी, २००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महिलांच्या विकासाच्या कामासाठी (स्वंयसहाय्यता बचत गटांची निर्मिती, महिलांचे विशेष प्रशिक्षण कार्यक्रम, महिला उत्पादनांसाठी बाजारपेठ व अनुषंगिक आधारसेवा इ.) महिला आर्थिक विकास महामंडळास शिखर संस्था म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे वेतन कमी नसून त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते अदा करण्यात येतात.

(४) महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) नियमित १ कोटी इतके व्यवस्थापकीय अनुदान मंजूर आहे. तथापि, याव्यतिरिक्त आयफॅड या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आर्थिक सहाय्याचे राज्यामध्ये तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम माविममार्फत राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनापोटी राज्यशासनाचा हिस्सा म्हणून रू.७८.०० कोटी इतकी तरतूद सन एप्रिल, २००७ ते सप्टेंबर, २०१५ पर्यंत करण्यात आली आहे. या तरतुदीमधून सदर महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन अदा करण्यात येते.

(५) व (६) तेजस्विनी कार्यक्रम आणखी दोन वर्षे मुदत वाढ मिळणेबाबतची कार्यवाही सुरू असल्याने व या योजनेतून कर्मचारी वृंदाचे वेतन अदा करण्यात येत असल्याने सद्य:स्थितीत भत्ता वाढविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.